152

Seat No.

# महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची
# कनिष्ठ महाविद्यालये / उच्च माध्यमिक विद्यालये
## पूर्व परीक्षा - (२०१८-२०१९)

**इयत्ता : १२ वी, (शास्त्र आणि कला) विषय : भूगोल** **गुण : ८०**

**दिनांक : १५-१-२०१९** **वेळ : ९ ते १२**

**सूचना :**

१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

३) आवश्यकतेनुसार योग्य जागी आकृती, नकाशे, काढावेत

४) जगाचा नकाशासाठी स्टेन्सिलचा वापर करावा.

५) प्रश्न क्र. ६ करीता वापरलेली नकाशा पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेला जोडणे आवश्यक आहे. सूची काढा.

६) प्रत्येक नवीन प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहावे.

**प्र. १ अ) दिलेल्या रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करून पुन्हा लिहा. ६**

१) लोकसंख्येची घनता ...... खंडामध्ये सर्वात जास्त आहे.

(उत्तर अमेरिका, अफ्रिका, आशिया, दक्षिण अमेरिका)

२) भारतातून उत्तर अमेरिकेला नोकरी करीता जाणाऱ्या लोकांचे स्थलांतर ...... प्रकारचे आहे.

(धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक)

३) जगामध्ये चीनचा ..... उत्पादनात प्रथम क्रमांक लागतो.

(रबर, गहू, ऊस, कॉफी)

४) स्थलांतरीत शेती प्रामुख्याने ....... प्रदेशात केली जाते.

(वाळवंटी, उष्णकटीबंधीय, ध्रुवीय, समशीतोष्ण कटीबंधीय)

५) युरोपमधील .... या देशात रस्त्यांची घनता अधिक आहे.

(फ्रान्स, बेल्जियम, ऑस्ट्रिया, डेन्मार्क)

६) कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक विकासात ...... हा घटक महत्वाचा आहे.

(निसर्ग, मानव, जमीन, पाणी)

**ब) 'अ' स्तंभातील घटकांशी 'ब' स्तंभातील घटकांच्या योग्य जोड्या लावा.** ४

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) निग्रॉइड | अ) मध्य अमेरिका |
| २) मिल्पा | ब) संयुक्त संस्थानातील डॉलर |
| ३) बॉक्साईट | क) जिप्सम |
| ४) सर्वमान्य चलन | ड) पश्चिम आफ्रिका |
| | इ) ॲल्युमिनियम |

**प्र. २ अ) पुढील विधान पुर्ततेसाठी पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करून पुन्हा लिहा.** ६

१) मॅग्नेटाईट हे उच्च प्रतीचे लोहखनिज आहे. कारण ....

अ) ते काळ्या रंगाचे आहे.

ब) त्यामध्ये लोहाचे प्रमाण कमी आहे.

क) त्यामध्ये लोहाचे प्रमाण जास्त आहे

ड) त्याची किंमत कमी आहे

२) साखर उत्पादनात बीट हा उसापेक्षा अधिक महत्वपूर्ण कच्चामाल समजला जातो कारण....

अ) बीट दिर्घकाळ टिकविता येते

ब) ऊसापासून चोयट्या अधिक शिल्लक राहतात

क) बीट वाहून नेण्यास सुलभ आहे.

ड) बीट हे स्वस्त आहे.

३) ईशान्य संयुक्त संस्थानात उद्योग धंद्याचे केंद्रीकरण झाले आहे कारण ......

अ) मजुरांची उपलब्धता

ब) भांडवलाची उपलब्धता

क) कच्चा माल व शक्ती साधनांची विपुलता

ड) वाहतुक सुविधांची उपलब्धता

४) ...... व्यापार वृद्धीसाठी महत्वाचा घटक आहे.

अ) वाहतूक

ब) भांडवल

क) लोकसंख्या

ड) देशाचे स्थान

५) दक्षिण आशियाई देश हे उद्योग धंद्याच्या विकासासाठी पाश्चात्य देशांवर अवलंबून आहेत कारण.....

अ) ते विकसित देश आहेत

ब) ते विकसनशील देश आहेत.

क) त्या देशात संसाधने कमी आहेत.

ड) त्या देशांमध्ये अंतर्गत कलह आहेत.

६) कॅनडातील रस्त्यांचे जाळे उत्तर भागात कमी विकसित आहे कारण .......

अ) हवामान अती उष्ण आहे

ब) हवामान अती थंड आहे

क) विकास मर्यादित आहे

ड) लोकसंख्या विरळ आहे.

**ब) खालील संज्ञा स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** ४

१) व्यापार संतुलन

२) मानवी विकास निर्देशांक

३) स्थलांतर

**प्र. ३ भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही पाच)** १०

१) गंगेच्या मैदानामध्ये लोकसंख्या अतिशय दाट आहे.

२) लोक खेडेगावातून शहरी भागाकडे स्थलांतर करतात.

३) मंडईबाग शेतीला 'ट्रॅक फार्मिंग' असे ही म्हणतात.

४) कोळसा हे ऊर्जेचे सर्वांत महत्त्वाचे व स्वस्त साधन आहे.

५) विकसनशील देश गरीब आहेत.

६) आंतर राष्ट्रीय व्यापारासाठी बंदरे महत्वाची आहेत.

७) विकास प्रक्रियेत संसाधने महत्वाची असतात.

**प्र. ४ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही पाच)** १०

१) सार्क संघटनेविषयी माहिती लिहा.

२) निग्रॉईड वंशाच्या लोकांची वैशिष्ट्ये नमूद करा.

३) सखोल शेतीची वैशिष्ठ्ये लिहा.

४) नळमार्ग वाहतुकीचे महत्त्व सांगा.

५) साखर उद्योगाच्या स्थानिकीकरणासाठी अनुकूल असणाऱ्या कोणत्याही चार घटकांची नावे लिहा.

६) रेल्वे वाहतुकीच्या मर्यादा स्पष्ट करा.

७) आर्थिक विकास म्हणजे काय ?

**प्र. ५ टीपा लिहा. (कोणत्याही तीन)** १२

१) अंतरानुसार स्थलांतर

२) मळ्याची शेती

३) इलेक्ट्रॉनिक उद्योग

४) खनिजांचे वर्गीकरण

५) आधुनिक दळणवळण साधनांचे महत्व.

**प्र. ६ दिलेल्या जगाच्या नकाशा आराखड्यामध्ये पुढील बाबी योग्य चिन्हांच्या साहाय्याने दाखवून सूची तयार करा. (कोणतेही पाच)** १०

१) सर्वात जास्त लिंग गुणोत्तर असणारा खंड.

२) सर्वाधिक लोकसंख्येची घनता असणारा आफ्रिकेतील देश.

३) व्हेल्ड गवताळ प्रदेश

४) जपान

५) जगात मॅग्नीज उत्पादनात अग्रेसर असलेला देश.

६) मुंबई आंतरराष्ट्रीय बंदर

७) पनामा कालवा.

**प्र. ७ पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी १२ ते १५ ओळीत लिहा. (कोणतेही दोन)** १०

१) सुएझ कालवा मार्गाविषयी थोडक्यांत वृत्तांत लिहा.

२) व्यापाराची व्याख्या सांगून व्यापाराचे विविध प्रकार स्पष्ट करा.

३) खनिज तेलाच्या जागतिक वितरणाचा सविस्तर वृत्तांत लिहा.

४) चहा पिकाच्या लागवडीसाठी आवश्यक भौगोलिक स्थितीचे वर्णन करून जागतिक वितरण स्पष्ट करा.

**प्र. ८ खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** ८

१) कृषीवर आधारीत उद्योगधंद्यांची नावे लिहा, जगातील प्रमुख सुती वस्त्रोद्योगांचे वर्णन करा.

२) लोकसंख्या वितरणावर परिणाम करणारे प्राकृतिक घटक स्पष्ट करा.

• • •